<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

<u>**महापालिका सर्वसाधारण सभा**</u>

महानगरपालिकेच्या मंगळवार, दिनांक 20/06/2017 रोजी भरलेल्या माहे जून महिन्याच्या (मुळ सभा 19 मे 2017) सर्वसाधारण तहकूब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 20 जून 2017**<br>**निर्णय -** | प्रश्नोत्तरे<br><br>**<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 20 जून 2017** | पनवेल महानगरपालिकेकरीता सुखापुर येथे 150 मी.मी. व्यासाची नळजोडणी देऊन माहे एप्रिल ते 15 जुन अखेर दरवर्षी 5.00 द.ल.ली. पाणी देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/04/2017 चे पत्र क्र.नमुंमपा/श.अ./635/2017. |
| **<u>ठराव क्र. 1734.</u>**<br>**दिनांक 19 मे 2017** | "पनवेल महानगरपालिकेकरीता सुखापुर येथे 150 मी.मी. व्यासाची नळजोडणी देऊन माहे एप्रिल ते 15 जुन अखेर दरवर्षी 5.00 द.ल.ली. पाणी देणेच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पनवेल महानगरपालिकेस नमुंमपाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करून घेवून सध्याच्या उन्हाळा व पनवेल शहराची पाणी टंचाई विचारात घेता पनवेल महानगरपालिकेस सुखापूर येथे 150 मी.मी. व्यासाची नळजोडणी देऊन शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी माहे एप्रिल ते 15 जून अखेर दरवर्षी 5.00 द.ल.ली. प्रतिदिनी पाणी देण्यास, महाराष्ट्र महागनरपालिका अधिनियम, कलम 201 अन्वये पनवेल शहर महानगरपालिकेस पाणी पुरवठा करण्याच्या अटी शर्तीस तसेच रू. 9.00 प्रति 1000 लीटर एवढ्या दराला, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>नामंजूर</u>** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे 19 मे 2017 ची सर्वसाधारण तहकूब सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिष्ट :-**<br>प्रभाग क्र. 08 चिंचपाडा - गवतेवाडी येथील संपूर्ण भागात मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. | 09<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 2. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिष्ट :-**<br>प्रभाग क्र. 08 चिंचपाडा - गवतेवाडी भागातील गवतेवाडी व थॉमसन कंपनीच्या शेजारी असलेले मानवी वस्तीमध्ये गटारे व पदपथ बसविणे. | 10<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 3. | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिष्ट :-**<br>"प्रभाग क्र. 08 चिंचपाडा नाका कै. सुनिल चौगुले चौक व रिलायबल कंपनी समोर पथसंकेत लावणे. | 11<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 4. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 99 अंतर्गत नेरूळ सेक्टर 19, येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणाची सुधारणा करणे या कामा अंतर्गत करणेत येत असलेले स्केट पार्कचे काम जुलै 2016 मध्ये बंद करण्यात आले आहे. तरी सदर काम सुरु करण्यात यावे व लवकरात पुर्ण करणे. | 12<br>मे | 1735<br>20/06/2017 | मंजूर |
| 5. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 99 अंतर्गत नेरूळ सेक्टर 19, येथील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणातील कम्युनिटी हॉल, ओपन स्टेज व त्याच्या बाजुला चेंजिग रूम, कबड्डी कोर्ट आणि बॅटमिंटन कोर्टचे काम काढण्यात आले होते. तरी ते लवकरात लवकर पुर्ण करणे. | 13<br>मे | 1736<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 6. | **श्रीम. सलुजा संदीप सुतार, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 99 मधून करावे किंवा फेज 2 ला जाणेसाठी पुर्वी असणारे रेल्वेट्रॅक वरील फाटक बंद झाल्यामुळे येथील नागरिकांना सेक्टर 25 येथील ब्रिज वरून जावे लागते व ते लांब पल्याचे होते. तरी माझ्या प्रभागात सेक्टर 23-बी येथील प्लॉट क्र. 45 च्या मागे करावे साईडला जोडणारा स्कायवॉक ब्रीज बांधणे. | 14<br>मे | 1737<br>20/06/2017 | मंजूर |
| 7. | **श्री. निवृती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>"14 डिसेंबर 2016 रोजी सिडको प्राधिकरणाकडून नवी मुंबई महानगरपालिकेकडे घणसोली नोड हस्तांतर झाला आहे. त्यानुसार समाज उपयोगासाठी सन 2010 च्या सिडको प्राप्त घणसोली नोडच्या नकाशा नुसार माझ्या प्रभाग क्र.29 घणसोली 2 मध्ये येत असलेल्या सेक्टर 21 मधील भूखंड क्र.2 हा शाळेसाठी राखीव ठेवलेला आहे. प्रभाग क्र. 29 या प्रभागात वाढणारी लोकसंख्या विचारात घेता,प्राथमिक व माध्यमिक शाळेची इमारत होणे गरजेची आहे. तरी सेक्टर-21मधील भूखंड क्र.2 हा महापालिकेच्या ताब्यात घेवून इयत्ता 1 ते 7वी प्राथमिक व 8वी ते 10वी माध्यमिक मराठी शाळेसाठी इमारत बांधणे. | 15<br>मे | 1738<br>20/06/2017 | मंजूर |
| 8. | **श्री. निवृती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 29 घणसोली 2 या प्रभागात येणाऱ्या सेक्टर 21 मध्ये सिडको प्राधिकरणाकडून भूमिगत व उच्चस्तरीय जलकुंभ बांधण्यासाठी भूखंड राखीव ठेवला आहे. सेक्टर 21 व 22 या भागाला योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. तसेच या भागात अजून मोठया प्रमाणात नागरिवस्ती वाढणार आहे. या गोष्टी विचारात घेता सदरचा भूखंड सिडकोकडून महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून सेक्टर 21 येथे भूमिगत व उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे. | 16<br>मे | 1739<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 9. | **श्री. निवृती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 29 घणसोली 2 येथील अनंतनगर येथे फार पूर्वी पासून तलाव आहे. "छत्रपती शिवाजी महाराज तलाव" या नावाने हा तलाव ओळखला जात आहे. या ठिकाणी तळवली गांव, घणसोली गांव व परिसरातील गणेश विसर्जन तसेच नवरात्रौत्सवातील देवीचे विसर्जन केले जात आहे. नव्या मुंबईतील तलावांचे सुशोभिकरण झाले आहे. तरी घणसोली गावातील या तलावाचे सुशोभिकरण करण्यात येवून, या ठिकाणी तलावाच्या भोवती जॉगिग ट्रक, लहान मुलांसाठी खेळ साहित्य कवीकट्टा, नागरिकांना बसण्यास बँच व ए.ल.डी. दिव्यांचा वापर करून या तलावाचे सुशोभिकरण करणे. | 17<br>मे | 1740<br>20/06/2017 | मंजूर |
| 10. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"मा. श्री. संदीप ठाकूर सो यांनी नवी मुंबई महानगरपालिका नगररचना विभागाच्या विरोधात सन 2016 मध्ये न्यायालयात पार्कींग आणि आर. जी. (R.G.) संदर्भात दावा दाखल केला होता. त्यावरून न्यायालयाचे आदेश आल्यानंतर महानगरपालिकेच्या हद्दीतील एल.आय. जी. ग्रुप मधील सी.सी./ओ.सी.(C.C./O.C.) देण्याचे थांबविले आहे. त्यावर आपल्याला धोरणात्मक निर्णय घेणे. | 18<br>मे | 1741<br>20/06/2017 | मंजूर |
| 11. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 12, सेक्टर-2 मधील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, ज्ञानदिप शाळेमागील उद्यान तसेच जनता मार्केट शेजारील असलेल्या उद्यानाच्या लोखंडी जाळ्या तुटून पडल्यामुळे त्या चोरीला जातात. त्यामुळे उद्यानाला नविन व चांगल्या दर्जाच्या लोखंडी जाळ्या लावून उद्यान अद्यावत करून देणे. | 19<br>मे | 1742<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 12. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 12, सेक्टर-2 मधील ज्ञानदिप शाळेच्या पटांगणाच्या आवारात पोलिस चौकी आहे. परंतु त्या ठिकाणी पोलिस नसल्याकारणाने त्या पोलिस चौकीचा गैरप्रकारे वापर होत असून तात्काळ ती पोलिस चौकी ज्ञानदिप शाळेला हस्तांतरीत करणे. | 20<br>मे | 1743<br>20/06/2017 | मंजूर |
| 13. | **श्री. जयवंत द. सुतार, यांजकडून :-**<br>"नवी मुंबई महानगरपालिकेची घनकचरा संकलन, वहन विल्हेवाटीशी निगडीत सर्व बाबी आणि वस्तु नियमित करण्यासाठी उपविधी तयार करण्यात यावी. सदर उपविधीमध्ये सार्वजनिक ठिकाणी, नवी मुंबई महानगरपालिकाक्षेत्रामध्ये नागरी घनकचरा निर्माण करणाऱ्या प्रत्येकास आणि कोणत्याही व्यक्तीची मालकी किंवा ताब्यात असलेली प्रत्येक इमारत या साठी उपविधी तयार करावी. जेणेकरुन नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये स्वच्छतेच्या दृष्टीने दंडात्मक कार्यवाही करता येईल. तरी उपविधी करणे. | 21<br>मे | 1744<br>20/06/2017 | मंजूर |
| 14. | **श्री. जयवंत द. सुतार, यांजकडून :-**<br>"नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रत्येक विभागाच्या नागरी कामांच्या निविदा काढल्या जातात ठेकेदार सदर निविदा अधिक किंवा कमी भरत असतात. त्यानुसार त्यांस कामाची वर्कऑर्डर दिली जाते. त्यानुसार ठेकेदार कामे करतात. काम केल्यानंतर त्यास किती दिवसांनी बिल देणे अपेक्षित आहे. बिल देणेबाबत नियमावली तयार करणे. | 22<br>मे | 1745<br>20/06/2017 | मंजूर |
| 15. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>"इतर राज्याच्या महानगरपालिकांप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतून जाणारे जे राष्ट्रीय महामार्ग (National Highway), राज्य महामार्ग (State Highway) व द्रुतगती महामार्ग जात आहेत. ते नवी मुंबई महानगरपालिकेने स्वत:कडे हस्तांतरीत करणे. | 23<br>मे | 1746<br>20/06/2017 | मंजूर |
| 16. | **सौ. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 96, नेरुळ सेक्टर-16ए, 16 व 18 येथील नागरिकांना चालण्यासाठी बॅरीअर फ्री वॉकेबिलिटी संदर्भातील तत्सम कामे (फुटपाथ, दुरुस्ती, रॅम्प बनविणे, सर्कल करीता ग्रील बसविणे व रंगकाम करणे) लवकरात लवकर करणे. | 24<br>मे | 1747<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **17.** | **सौ. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 96, नेरुळ सेक्टर-16ए, 16 व 18 येथे जेष्ठ नागरिकांना विश्रांतीसाठी निवारा शेड उभारणे. | 25<br>मे | 1748<br>20/06/2017 | मंजूर |
| **18.** | **सौ. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 96, नेरुळ सेक्टर-16ए येथील भूखंड गि. 150 च 151 च्या चारही बाजुने मजबुत संरक्षक भिंत बांधणे. | 26<br>मे | 1749<br>20/06/2017 | मंजूर |
| **19.** | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97, सेक्टर-20 डी टाईप बालाजी मंदिराच्या मागे मोकळा भुखंड आहे. तेथे सध्या अनधिकृत झोपडपट्टी असून तो भुखंड गार्डनसाठी राखीव आहे. तरी त्या जागी मुलांसाठी त्वरीत गार्डन उपलब्ध करुन देणे. | 27<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **20.** | **श्री. काशिनाथ वामन पवार यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 97, आगरी कोळी भवनच्या मागील बाजूर मोकळा भुखंड आहे. तरी त्या जागी मुलांसाठी, जेष्ठ नागरीकांसाठी गार्डन उपलब्ध करून देणे. | 28<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **21.** | **श्री. काशिनाथ वामन पवार यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 97 मधील सर्व मोकळया भुखंडावर त्वरीत संरक्षक लोखंडी कुंपण घालणे. | 29<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **22.** | **श्रीम. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**<br>"रामनगर येथे ओपन जिम बांधणे. | 30<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **23.** | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**<br>"रामनगर दिघा येथील मुकुंद कंपनीजवळील महानगरपालिकेकडे एम.आय.डी.सी. कडून हस्तांतरण झालेल्या प्लॉटवर आरोग्य केंद्र बांधणे. | 31<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **24.** | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**<br>सुभाषनगर येथे दश लक्ष लिटर (10,00,000) क्षमतेची ओव्हर हेड पाण्याची टाकी बांधणे. | 32<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **25.** | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-**<br>"इलठणपाडा येथील मुख्य पावसाळी नाल्याचे कन्हैयानगर येथे कॉक्रिटीकरण करुन नाला बांधणे. | 33<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **26.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्रं. 55, कोपरखैरणे सेक्टर 11 येथील जॉगींग ट्रक व खैरणे गाव तलाव येथे सुरक्षा रक्षकांसाठी कॅबीन पुरविणे. | 34<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **27.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्रं. 55, कोपरखैरणे सेक्टर 11 येथील जॉगींग ट्रकवर लांबीच्या दिशेने अंतर दर्शविणारे फलक लावणे. | 35<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **28.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्रं. 55, खैरणे गांव येथे बुध्द विहार समोर प्रवेशद्वार कमान बांधणे. | 36<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **29.** | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 79, सानपाडा सेक्टर 07 येथील सिडकोकालीन सिताराम मास्तर उद्यान विकसित करणे. | 37<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **30.** | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 79, सानपाडा सेक्टर 11, नाल्यामध्ये मगरीचे अस्तिव व प्रदुषणाचा त्रास, यासाठी नाला कव्हर करावा किंवा संरक्षक भिंत घालावी व परिसर स्वच्छ ठेवणे. | 38<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 31. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 79, सानपाडा सेक्टर 9, झाशीची राणी मैदानाची संरक्षक भिंत बांधणे. | 39 मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 32. | **श्रीम. कमल धनाजी पाटील, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 76 व 105 हिंदी माध्यमाची शाळा सुरु आहे. या शाळेच्या इमारतीमध्ये नवीन मराठी माध्यमाची शाळा सुरु करण्यात यावी. शाळा क्र. 76 या इमारतीमध्ये सध्या बालवाडी ते 8 वी हिंदी माध्यमाची शाळा सुरु आहे तसेच शाळा क्र. 105 माध्यमिक शाळेत 9 वी ते 10 वी पर्यंत हिंदी व मराठी माध्यमाची शाळा सुरू आहे. याच इमारती मध्ये मराठी बालवाडीचे दोन वर्ग भरतात. त्यामध्ये जवळ-जवळ 121 विद्यार्थी शिकत आहेत. पण त्यांना त्या ठिकाणी महापालिकेची 1 ली ते 8 वी मराठी माध्यमाची शाळा नसल्यामुळे त्यांना खाजगी शाळेत जावे लागत आहे. म्हणून त्या ठिकाणी मराठी माध्यमाची नवीन शाळा सुरू करावी. जेणेकरून त्या विद्यार्थ्यांना त्याच शाळेत पुढील शिक्षण घेता येईल. शाळेच्या आजूबाजूच्या सर्व परिसरात 100% मराठी लोकवस्ती आहे. मात्र त्या ठिकाणी हिंदी शाळा असल्यामुळे त्यांना पुढील शिक्षणासाठी दुसऱ्या शाळेत जावे लागते. आपल्या शाळेत एका सत्रात मराठी व एका सत्रात हिंदी शाळा सुरू केल्यास जवळपासच्या सर्वच घटकांना मोफत शिक्षणाची सोय होईल. त्यासाठी आपण लवकरात लवकर नवीन मराठी शाळा सुरू करणे. | 40 मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 33. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून : -** "घणसोली विभागातील पावसाळ्यापूर्वीची सर्व कामे करण्यात यावीत व सर्व नाले, गटारे, विहीरी यांची साफसफाई करणे. | 41 मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 34. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून : -** "घणसोली विभागातील रस्ते व पदपथांची दुरूस्ती करणे. | 42 मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 35. | **श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून : -** घणसोली विभागातील विद्युतसंबंधी सर्व समस्या तपासून जुन्या वायर्स, केबल काढून नवीन केबल लावणे, नवीन डिपी बॉक्स लावणे, जुने स्ट्रीटलाईट खांब काढून आवश्यक त्याठिकाणी नवीन खांब लावणे. | 43<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 36. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** घणसोली विभागातील प्रभाग क्र. 27 अंतर्गत सेक्टर - 25 मध्ये दिवाबत्तीची सोय करणे. | 44<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 37. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27, 28 व 29 अंतर्गत एकही मार्केट उपलब्ध नाही. प्रभाग क्र. 27 अंतर्गत घणसोली गावाच्या सुरूवातीला अर्जुनवाडीला लागून जो नाला आहे तो नाला बंदिस्त करून (नाल्यावर स्लॅब टाकून) तेथील विभागासाठी मार्केट (व्यवसायिक गाळे) व पे ॲण्ड पार्क (पार्किंगची) सुविधा करणे. | 45<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 38. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागातील विद्युत वायर भूमिगत करणे. | 46<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 39. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर, येथील गट क्र. 40 ह्या सिडकोच्या 1300 चौ.मी. भूखंडावर आरोग्य केंद्र, व्यायाम शाळा, बचत गट भवन, वाचनालय याकरिता बहुउद्देशीय इमारत बांधणे. | 47<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 40. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 01 ईश्वरनगर येथे संपूर्ण प्रभागात नवीन सेवरेज लाईन(मलनि:स्सारण वाहिनी) टाकणे. | 48<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 41. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 54, मधील, वाशी सेक्टर-28 व 29 मधून वाहणारा उघडा नाला हा नागरी वस्तीतुन वाहणारा एकमेव नाला आहे. नाल्याच्या दोन्ही बाजूस रस्ता आहे. सदर रस्त्यावरील वाहतुक प्रचंड प्रमाणात वाढली असून कोपरखैरणे कडून पामबीच मार्गाला जाण्यासाठी, टीटीसी रबाळे येथे जाण्यासाठी, एपीएमसी मार्केटमध्ये जाण्यासाठी सदर नाल्याच्या बाजूकडील रस्ता अरूंद असल्याने वाहनांची प्रचंड कोंडी गेल्या वर्षभरात दिसून येत आहे. उघड्या नाल्यामुळे डास व इतर घाणीचा प्रार्दुभाव जाणवतो. परंतु आता त्यात वाहन कोंडीमुळे होणाऱ्या प्रदुषणाची भर झाली आहे. सदर नाला बंदिस्त करून त्या नाल्यावरील मधला रस्ता दोन्ही बाजूकडील वाहतुकीस वापरल्यास वाहतुक कोंडी कमी होईल. तसेच नाल्यामुळे होणारी रोगराई व दुर्गंधीस आळा बसेल. नाल्यावरील रस्ता मुख्य वाहतुकीस तर दोन्ही बाजूकडील सध्या असलेला रसता सर्विस रोड म्हणून वापरता येईल. तरी सदर नाल्यावर रस्ता बांधण्याची अतिशय गरज असल्याने याबाबत योग्यती कार्यवाही करणे. | 49<br>मे | 1750<br>20/06/2017 | मंजूर |
| 42. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 54 मधील, वाशी सेक्टर 28 व 29 मधील सर्व अंतर्गत रस्ते अतिवृष्टीमुळे उंचसखल झाले असून रस्त्यावर बरेच खड्डे आहेत. बऱ्याच ठिकाणी रस्त्यावरील डांबर वाहून गेल्याने रस्ते निट दुरूस्त झाले नसल्याने संपूर्ण रस्त्याची पाहणी करून योग्यती दुरूस्ती व डांबरीकरण तातडीने करणे. | 50<br>मे | 1751<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 43. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-** "प्र. क्र. 54, सेक्टर 29 मधील डायमंड गृहनिर्माण संस्था ते सीटी कॉर्नर 1 च्या पाठीमागील बाजूस 500 मीटर X 20 मीटरचा ट्रीबेल्ट असून, ट्रीबेल्ट लगत असणाऱ्या नाल्यामधुन सतत सोसायटीमध्ये येणाऱ्या विषारी सापांचा व भुरट्या चारांचा प्रदुर्भाव वाढल्याने तेथील नागरीकांनामध्ये भितीचे वातावरण तयार झालेले आहे हा त्रास कमी होण्यासाठी, नाला व ट्रीबेल्टच्या मधून 20 X 500 मीटर लांबीची व 6 फुट उंचीची भिंत बांधणे. | 51 / मे | 1752 / 20/06/2017 | मंजूर |
| 44. | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-** "सिलंबम कला ही 5000 वर्षा पासूनची प्राचिन कला आहे. या कलेचा उपयोग प्राचिन युध्दापासून होत आहे. तसेच ही कला महिलांना अवगत झाली तर सर्व महिला स्वरक्षणासाठी सक्षम राहतील. तरी ही कला जोपासण्यासाठी व आपल्या संस्कृतीच्या या महान कलेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत उपक्रम राबवले जावेत. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत दर आठवड्याला या कलेचे मोफत प्रशिक्षण वर्ग भरवण्यात यावे जेणे करून या कलेबद्दल आजच्या युवा पिढीला व महिलांना ज्ञान प्राप्त होईल व स्वरक्षणासाठी समर्थ होतील. तसेच 2 मे 2017 रोजी कोपरखैरणे येथे “ऑल महाराष्ट्र सिलंबम असोशिएशन” मार्फत झालेल्या कार्यक्रमात सिलंबम कलेचे प्रर्दशन झाले. यावेळी ACP किरण पाटील यांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप देऊन सिलंबम कलेला जोपासन्याचे आव्हान दिले आहे. तरी नवी मुंबई महानगरपालिकने हे आव्हान स्विकारावे, | 52 / मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 45. | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-** "प्र. क्र. 87 च्या भौगोलिक सीमा क्षेत्रातील मनपाने उभारलेल्या निवारा शेड व ओजस हॉस्पिटलमध्ये असलेल्या मोकळ्या सार्वजनिक जागेवर बालवाडी, अंगणवाडी केंद्रांची उभारणी करणे. | 53 / मे | 1753 / 20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **46.** | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 87, मधील सेक्टर 8 मधील राजश्री शाहू महाराज उद्यानालगत असलेल्या जुन्या सार्वजनिक शौचालयाची पुर्नबांधणी अथवा वाढीव बांधकाम करून त्याठिकाणी महिला वर्गासाठी सुलभ प्रसाधन गृहाची तरतूद करणे. | 54<br>मे | 1754<br>20/06/2017 | मंजूर |
| **47.** | **श्रीम. सुनिता रतन मांडवे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 87 मधील जुन्या दगडी बांधकामांच्या पावसाळी गटारांची दुरावस्था झाली असल्याने आर.सी.सी. पध्दतीने पुर्नबांधणी करणे. | 55<br>मे | 1755<br>20/06/2017 | मंजूर |
| **48.** | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 51 मध्ये हेवी ड्युटी गटर बनविणे. | 56<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **49.** | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51, मध्ये पथदिव्यांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे प्रभागातील पथदिवे नव्याने बसविणे. | 57<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **50.** | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>केंद्रशासनाने अपंग शब्दाऐवजी दिव्यांग शब्दाचा वापर करण्यांकरिता शासन आदेश काढून अंमलबजावणीकरिता सर्वांना प्रस्तावित केलेला आहे. त्याअनुषंगाने महापालिकेच्या अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राचे नाव बदलून दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र करणे. | 58<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 51. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सिडकोद्वारा बांधण्यात आलेल्या इमारती ज्यांना 25 वर्षाहून अधिक किंवा धोकादायक झालेल्या इमारतीना 2.5 एफ.एस.आय. राज्य शासनाच्या माध्यमातून मंजूरी देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील खाजगी सोसायटी व प्लॉट धारकांना सुध्दा 2.5 एफ.एस.आय. मिळावा याकरिता प्रस्ताव तयार करून राज्यशासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यांत यावे. जेणेकरून खाजगी सोसायटी व प्लॉट धारकांना सुध्दा 2.5 एफ.एस.आय. प्राप्त करता येईल, | 59<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 52. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>वाशी, सेक्टर-6 येथून सायन-पनवेल हायवे ओलांडून वाशीगांव बसस्थानक जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर खूप अपघात झालेले आहेत व बहुतांशवेळा सिग्नल बंद असल्याकारणाने नागरिकांना सायन-पनवेल हायवे ओलांडण्याकरिता मोठी कसरत करावी लागते व कित्येक वेळा अपघाताला सामोरे जावे लागते. तरी वाशी, सेक्टर-6 येथून सायन-पनवेल हायवे ते वाशीगांव बसस्थानकापर्यंत फूट ओव्हर ब्रीज (FOB) बांधणे. | 60<br>मे | 20/06/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 53. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 108, सेक्टर 48 शाळेजवळील फूटपाथला लागून बॅरीगेट लावणे. | 61<br>मे | 1756<br>20/06/2017 | मंजूर |
| 54. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 108, सेक्टर 50W येथील E-toilet जवळील मोकळ्या जागेवर सुशोभिकरण करणे. | 62<br>मे | 1757<br>20/06/2017 | मंजूर |
| 55. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 95, येथील कै.पंडित रामा भगत उद्यानात ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे ज्याप्रकारे ओपन जिम बनविले आहे. त्याचप्रकारे सदर उद्यानातही ओपन जिम बनविणे. | 63<br>मे | 1758<br>20/06/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **56.** | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br><br>"प्र. क्र. 95, मधील हनुमान मंदिरापासून ते खंडोबा मंदिरापर्यंत गटर व पदपथांची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे तेथे नव्याने गटर व पदपथ बनविणे. | 64<br>मे | 1759<br>20/06/2017 | मंजूर |
| **57.** | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br><br>"प्र. क्र. 95, मधील खंडोबा मंदिरापासून ते श्री. शांताराम ठाकूर यांच्या घरापर्यंत गावातील मुख्य रस्त्यावरील गटर व पदपथाची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे तेथे नव्याने गटर व पदपथ बनविणे. | 65<br>मे | 1760<br>20/06/2017 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**